# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

Date – 06 October 2023

Time 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०६ ऑक्टोबर २०२३ सकाळी ७.१० मि.**

****

- राज्यातल्या सर्व शासकीय रुग्णालयांच्या सद्यस्थितीचा अहवाल तातडीनं सादर करण्याचे मुख्यमंत्र्यांचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश;राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाची राज्यसरकारला नोटीस
- आरोग्यासह विविध समस्यांवर चर्चेसाठी विधीमंडळाचं दोन दिवसाचं विशेष अधिवेशन बोलावण्याची काँग्रेसची मागणी
- बीड आणि अहमदनगर जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या घटनेत पाच जणांचा पाण्यात बुडून मृत्यू
- एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला प्रारंभ;इंग्लंडला हरवत न्यूझीलंडची विजयी सलामी

आणि

- आशियाई क्रीडा स्पर्धेत कालही भारताची तीन सुवर्णपदकांना गवसणी

****

राज्यातल्या सर्व जिल्ह्यातल्या शासकीय रुग्णालयांच्या सद्यस्थितीचा अहवाल तातडीनं सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. काल सर्व जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधून राज्यातल्या आरोग्य सुविधांचा मुख्यमंत्र्यांनी आढावा घेतला. नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या रुग्णालयांमध्ये झालेल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीसाठी राज्यस्तरीय समिती नेमली असून, दोषींवर कडक कारवाई केली जाईल, असं त्यांनी सांगितलं. औषध खरेदीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांनाही

दिलेले आहेत, त्यामुळे औषध खरेदीत विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असं मुख्यमंत्र्यांनी सूचित केलं.

**

शासकीय रुग्णालयातल्या मृत्यू प्रकरणी स्वतःहून दखल घेत राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं राज्य शासनाच्या मुख्य सचिवांना नोटीस बजावली आहे. चार आठवड्यांत या प्रकरणाचा सविस्तर अहवाल द्यावा, असं त्यात म्हटलं आहे.

****

दरम्यान, विभागीय आयुक्त मधुकरराजे आर्दड यांनी काल नांदेडच्या शासकीय रुग्णालयाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला, तसंच रुग्णांशी संवाद साधला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही काल या रुग्णालयाला भेट दिली. शिंदे सरकार संवेदनाहीन असल्याची टीका त्यांनी यावेळी केली.

****

नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एस.आर. वाकोडे यांच्यासह बालरोग विभागातल्या डॉक्टरांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिष्ठाता आणि बालरोग विभागातल्या डॉक्टरांनी जाणीवपूर्वक उपचाराकडे दुर्लक्ष केलं, त्यामुळे या रुग्णालयात आई आणि नवजात अर्भकाचा मृत्यू झाल्याचं या तक्रारीत म्हटलं आहे.

****

आरोग्यासह राज्यातल्या विविध समस्या हाताळण्यात शिंदे सरकार पूर्णपणे अपयशी ठरलं असून, या प्रश्नांबाबत चर्चा करण्यासाठी विधीमंडळाचं दोन दिवसाचं विशेष अधिवेशन बोलवावं, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसच्या शिष्टमंडळानं काल राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेऊन याबाबत निवेदन दिलं. शासकीय रुग्णालयांमधल्या मृत्यूप्रकरणी वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि आरोग्य मंत्र्यांवर कारवाई करावी, मृत रुग्णांच्या कुटुंबांना प्रत्येकी दहा लाख रुपयांची मदत द्यावी, शासनसेवेतली पदं कंत्राटी स्वरुपात भरण्याचा शासननिर्णय तत्काळ रद्द करावा, आदी मागण्याही या निवेदनात करण्यात आल्या आहेत.

****

राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीसंदर्भात आज दुपारी केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे पक्षाचं निवडणूक चिन्ह मिळावं आणि अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता मिळावी, यासाठी अर्ज केला आहे. या दाव्याला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोध केला आहे.

****

प्रधानमंत्री पीक विमा योजनेची कोविड काळातली देय नुकसान भरपाई, शेतकऱ्यांना आठ दिवसात दिल्यास, पीक विमा कंपन्यांवर कारवाईचा इशारा, कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिला आहे. यासंदर्भातल्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. या योजनेत सहभागी असलेल्या सहा कंपन्यांपैकी चार कंपन्यांकडून दोनशे चोवीस कोटी रुपये येणं बाकी आहे, कोविड ही जागतिक आपत्ती होती, त्यामुळे कंपनीने सहकार्याची भूमिका घ्यावी, असं आवाहन मुंडे यांनी केलं आहे.

****

सिक्कीम मध्ये ढगफुटीमुळे आलेल्या पुरात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १८ वर पोहोचली असून, २६ जण जखमी झाले आहेत. तर लष्कराच्या सैनिकांसह सुमारे शंभरावर लोक बेपत्ता आहेत. यामध्ये बीड जिल्ह्यातले सैनिक पांडुरंग तावरे यांचाही समावेश आहे. ते पाटोदा तालुक्यातल्या काकडहिरा इथले रहिवासी आहेत.

****

बीड जिल्ह्यात अंबाजोगाई तालुक्यातल्या काल बहीण-भावाचा तळ्यात बुडून मृत्यू झाला. अश्विनी जाधव आणि रोहित चव्हाण असं यांचं नाव असून, ते दोघं कपडे धुण्यासाठी ता तळ्यावर गेले असताना ही दुर्घटना घडली.

अहमदनगर जिल्ह्यातल्या खर्डा इथं देखील कपडे धुण्यासाठी तलावावर गेलेल्या तीन शाळकरी मुलांचा बुडून मृत्यू झाला. दीपक, सानिया आणि कृष्णा सुरवसे अशी त्यांची नावं असून, हे तिघेही आई-वडिलांना कपडे धुण्यात मदत करण्यासाठी तलावावर गेले असता हा अपघात झाला.

****

एकदिवसीय क्रिकेट विश्वचषक स्पर्धेला कालपासून प्रारंभ झाला. सलामीच्या सामन्यात न्यूझीलंडनं इंग्लंडचा नऊ गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करत इंग्लंडनं ५० षटकात नऊ बाद २८२ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंडच्या

संघानं ३७व्या षटकात एक गडी गमावत हे लक्ष्य साध्य केलं. भारताचा या स्पर्धेतला पहिला सामना येत्या रविवारी ऑस्ट्रेलियासोबत चेन्नईत होणार आहे.

****

चीनमध्ये सुरु असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत काल १२ व्या दिवशी भारतानं तीन सुवर्ण, एक रौप्य आणि एका कांस्य पदकांची कमाई केली. या स्पर्धेत भारत २१ सुवर्ण, ३२ रौप्य आणि ३३ कांस्य पदकांसह एकूण ८६ पदकं जिंकून पदक तालिकेत चौथ्या क्रमांकावर कायम आहे.

***''तिरंदाजीत भारताच्या महिला आणि पुरुष संघांनी सुवर्ण पदक पटकावलं. पुरुष संघानं दक्षिण कोरियाचा, तर महिला संघानं तैवानचा पराभव केला. स्क्वॅश मध्ये मिश्र दुहेरी प्रकारात दिपिका पल्लिकल आणि हरिंदर पाल संधू या जोडीनं सुवर्ण पदक जिंकलं. स्क्वॅश मध्येच पुरुष एकेरीत सौरव घोषालनं रौप्य, तर कुस्तीमध्ये अंतिम पंघालनं कांस्य पदक जिंकलं. बॅडमिंटनमध्ये एच. एस. प्रणॉयनं उपांत्य फेरीतलं स्थान निश्चित केलं. भारताच्या पुरुष कबड्डी संघानं अ गटातलं प्रथम स्थान कायम ठेवत उपांत्य फेरीत प्रवेश केला.''***

****

दिव्यांग बांधवांना शासनातर्फे विविध सोयी सवलती मिळवून देऊन त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचं, दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. हिंगोली इथं काल 'दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी' या उपक्रमात ते बोलत होते. दिव्यांग लाभार्थ्यांना आवश्यक असलेल्या विविध प्रमाणपत्रांचं यावेळी प्रातिनिधीक स्वरूपात वाटप करण्यात आलं.

****

काँग्रेस पक्षाच्या वतीनं काल धाराशिव इथं शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयासमोर निदर्शनं करण्यात आली. यावेळी अधिष्ठातांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन पाठवण्यात आलं. नांदेडच्या रुग्णालय अधिष्ठातांना स्वच्छतागृहाची सफाई करायला लावणारे खासदार हेमंत पाटील यांना निलंबित करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. धुळे इथंही या मागणीसाठी काल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे आंदोलन करण्यात आलं.

****

पर्यावरणविषयक पत्रकारितेसाठी अर्थ जर्नालिझम नेटवर्क या संस्थेच्या अक्षय ऊर्जा कार्यशाळेला काल छत्रपती संभाजीनगर प्रारंभ झाला. आयआयटी पवईच्या पर्यावरण विभागातले प्राध्यापक डॉ. श्याम असोलेकर यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन झालं. प्रदूषणमुक्त आणि स्वच्छ पर्यावरणासाठी जागरूकतेने प्रयत्न करण्याची गरज डॉ असोलेकर यांनी व्यक्त केली. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशभरातून संवादक, तज्ज्ञ आणि संशोधक सहभागी झाले आहेत. काल पहिल्या दिवशी, प्रयास चे अश्विन गंभीर, महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरणाचे महाव्यवस्थापक विनोद शिरसाट आदींनी मार्गदर्शन केलं.

****

'मेरी माटी – मेरा देश' अभियानांतर्गत छत्रपती संभाजीनगर महापालिकेतर्फे काल शहरात अमृत कलश यात्रा काढण्यात आली. या यात्रेत शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते, नागरिकांनी यावेळी कलशात माती संकलित केली. ही माती दिल्ली इथं अमृत वाटिकेसाठी पाठवली जाणार आहे.

****

बीड जिल्ह्यात गेवराई इथल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत काल स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. या संस्थेतल्या सर्व कर्मचारी प्रशिक्षणार्थींनी उपजिल्हा रुग्णालयाचा परिसरही स्वच्छ केला.

वडवणी इथंही काल औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसह डॉ. बाबासाहेब अंबेडकर चौक आणि महादेव मंदिर परिसरात स्वच्छता मोहिम राबवण्यात आली.

****

शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने जनतेशी संवाद साधण्यासाठी छत्रपती संभाजीनगर शहरात सुरु असलेल्या होऊ दे चर्चा या उपक्रमात काल माजी खासदार चंद्रकांत खैरे सहभागी झाले होते. आगामी निवडणुकीत सत्ताधारी पक्षांचा पराभव निश्चित असल्यानं त्या धास्तीनं सरकार निवडणूक घेत नाही, अशी टीका त्यांनी यावेळी केली. या उपक्रमाअंतर्गत पक्षाचे नेते जनतेशी संवाद साधत आहेत.

****